**मुंबई मेट्रो मार्ग ६ स्वामी समर्थनगर- जोगेश्वरी- विक्रोळी या मार्गिकेस मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१६/प्र.क्र. १४० /नवि-७,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ डिसेंबर, २०१७.

<u>संदर्भ</u> : शासन निर्णय क्रमांक एमआरडी-३३१६/प्र.क्र.४१/नवि-७, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६.

<u>प्रस्तावना :</u>

०१. मुंबईतील वाहतूकीची कोंडी कमी करण्यासाठी मुंबई मेट्रो बृहत आराखडयातील मेट्रो मार्गांची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यासाठी मुंबई मेट्रो मार्गांची पुढील ३ ते ४ वर्षात खाली नमूद केलेल्या ११८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो रेल्वे मार्गाची त्वरीत अंमलबजावणी करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठरविले आहे.

| मार्गिकांची नावे | लांबी |
|---|---|
| • दहिसर (प) - डी.एन.नगर<br>• डी.एन.नगर - वांद्रे - मानखुर्द | १८ कि.मी<br>२३ कि.मी |
| • वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे -कासारवडवली<br>• वडाळा - मुख्य डाक कार्यालय (GPO) - आर.ए. किडवाई रोड मार्गे | ३२ कि.मी<br>८ कि.मी |
| • दहिसर (पू) - अंधेरी (पू)<br>• अंधेरी (पू) - वांद्रे (पू) | १७ कि.मी<br>०९ कि.मी |
| • जोगेश्वरी - विक्रोळी लिंक रोड | ११ कि .मी |
| एकूण | ११८ कि.मी |

२.० त्यास अनुसरुन मेट्रो मार्ग - २अ दहिसर (पूर्व) - डी. एन. नगर (१८.६ कि.मी.) आणि मेट्रो मार्ग-७ अंधेरी (पूर्व) - दहिसर (पूर्व) (१६.५ कि.मी.) या प्रकल्पांच्या कामास प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली आहे. तसेच मेट्रो मार्ग- २ ब डी. एन. नगर - मंडाळे आणि मेट्रो मार्ग- ४ - वडाळा - घाटकोपर - मुलुंड - ठाणे - कासारवडवली या प्रकल्पास शासनाने दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

०३. सदर मेट्रो रेल्वे मार्गांची त्वरीत अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्तावित मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा बृहत आराखडयामधील रेल्वे मार्गाची तपासणी पुनर्विलोकन, अद्ययावतीकरण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन मर्यादित (DMRC) यांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. उपरोक्त मेट्रो रेल्वे मार्गांची त्वरीत अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्तावित मेट्रो रेल्वे प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यास तसेच मुंबई मेट्रो लाईन-२ब डी.एन.नगर-मंडाळे व मुंबई मेट्रो मार्ग-४ वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली या मार्गिकेस शासनाने उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

०४. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उपरोक्त मार्गिकापैकी दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी प्राधिकरणाकडे सादर केलेल्या मेट्रो ६ स्वामी समर्थ नगर - जोगेश्वरी-विक्रोळी या मेट्रो प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालासह शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. सदर प्रकल्पांच्या प्रस्तावास राज्य शासनाकडून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सादर केलेल्या मेट्रो ६ स्वामी समर्थ नगर - जोगेश्वरी-विक्रोळी या मेट्रो प्रकल्पांच्या या मेट्रो प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यास पुढील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सादर केलेल्या मेट्रो मार्ग-६ स्वामी समर्थनगर - जोगेश्वरी-विक्रोळी (लांबी १४.४७ कि.मी., स्थानके १३) या मेट्रो रेल्वे प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (तपशिल सोबत परिशिष्ठ-१ म्हणून जोडला आहे).

२) दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी अंदाजित केलेल्या मेट्रो मार्ग-६ करीता पूर्णत्वाची किंमत रु.६७१६.०० कोटी [सन २०१६ च्या भावपातळीनुसार (सर्व कर, दरवाढ, जमीन आणि बांधकाम दरम्यानचे व्याज रु.२५ कोटी) इ.सह] इतक्या किंमतीस मान्यता देण्यात येत आहे.

३) मेट्रा मार्ग- २अ (१८.६ कि.मी.) प्रमाणेच मेट्रो मार्ग-६ (१४.४७ कि.मी.) असे दोन्ही मार्ग मिळून सुमारे ३३ कि.मी. लांबीचा मेट्रो प्रकल्प दिल्ली मेट्रो महामंडळामार्फत Deposit Work म्हणून राबविण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

४) मेट्रो मार्ग-६ स्वामी समर्थनगर - जोगेश्वरी-विक्रोळी या मेट्रो मार्गाची अंमलबजावणी “मेट्रो कायदा २००९ (सुधारीत)” नुसार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) सदर प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान मार्गिकांमध्ये (Alignment) तसेच स्थानकांमध्ये गरज भासल्यास किरकोळ बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) सदर प्रकल्प अंमलबजावणीकरीता प्राधिकरणाकडील स्वत:चा निधी व जागतिक बँक/एशियन विकास बँक/जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था इ. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेमार्फत कर्ज सहाय्य घेण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी कर्ज घेण्यात काही अडचणी उद्भवल्यास जागतिक बँक/जपान आंतरराष्ट्रीय सहकारी संस्था (JICA), BRICKS, AIB Bank, External Commercial Borrowing (ECB), Bonds या आंतरराष्ट्रीय /आंतर्देशीय किंवा इतर द्विपक्षीय, बहुपक्षीय वित्तीय संस्थेमार्फत कर्ज सहाय्य त्याचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही या अटीवर एमएमआरडीएने घेण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

७) सदर प्रकल्पासाठी द्विपक्षीय/बहुपक्षीय/आंतरराष्ट्रीय/आंतरदेशीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेणेसाठी केंद्र सरकार आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्याबरोबर समन्वय साधणे आणि प्रकल्प अंमलबजावणीच्या पुढील सर्व कार्यवाहीकरीता त्याचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही याअटीवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला प्राधिकृत करण्यात येत आहे.

८) देशातील विविध मेट्रो प्रकल्प राबविण्यासाठी केंद्रशासनामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याच धर्तीवर तसेच केंद्रशासनाच्या सन २०१७ च्या मेट्रो धोरणानुसार या प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडून निधी मिळविण्याकरीता सदर प्रकल्पास राज्यशासनाची मान्यता मिळाल्यानंतर सदर प्रस्ताव केंद्रशासनास पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९) सदर प्रकल्पासाठी बाह्यसाहित कर्ज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण घेणार आहे. तथापि, सदर कर्ज सहाय्यासाठी राज्यशासनामार्फत हमी देण्याची आवश्यकता भासल्यास, त्याचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही या अटीवर राज्यशासनाकडून हमी देण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. सदर कर्जामुळे राज्यशासनावर कोणतेही अतिरिक्त दायित्व/जबाबदारी येणार नाही, याची खबरदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घ्यावी.

१०) सदर प्रकल्प द्विपक्षीय / बहुपक्षीय / आंतरराष्ट्रीय / आंतरदेशीय अशा विविध संस्थांकडून एमएमआरडीएला प्रत्यक्ष कर्ज उपलब्ध न झाल्यास, सदर कर्ज घेणेकरीता राज्य शासनाकडून हमीपत्र दिल्यास अशा कर्जाच्या मुद्दलाची परतफेड तसेच व्याजाची परतफेड याची जबाबदारी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांची राहील. त्याचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही, याची खबरदारी घेण्याबाबत संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांनी घ्यावी.

११) मेट्रो मार्ग-६ साठी केंद्र शासनाच्या निधी उपलब्धतेची वाट न पाहता एमएमआरडीएने प्राधिकरणाचा निधी वापरुन मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१२) सदर प्रकल्प मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण करावयाचे उद्दिष्ट असल्याने, प्रकल्पाचे स्थापत्य बांधकाम सुरुवातीला एमएमआरडीएने प्राधिकरणाचा निधी वापरुन पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या रु. २४१०.९० कोटी खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

१३) सोबत जोडलेल्या परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्राधिकरणातर्फे सहभाग भागभांडवल उभारुन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्याचे कोणतेही अतिरिक्त दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही त्याची पूर्णपणे एमएमआरडीएची जबाबदारी राहील, या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

१४) सदर प्रकल्पाकरीता बहुपक्षीय / व्दिपक्षीय आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थाकडून थेट कर्ज घेण्यास व त्यासाठीची सुरक्षा रक्कम (Guarantee Fee) प्राधिकरणामार्फत देण्यास त्याचे कोणतेही अतिरिक्त दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही त्याची पूर्णपणे एमएमआरडीएची जबाबदारी राहील, या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

१५) अशा प्रकल्पामधील मोठ्या प्रमाणात आवश्यक असलेली गुंतवणूक तसेच प्राधिकरणाने यापूर्वी हाती घेतलेल्या प्रकल्पाकरिता लागणारा निधी विचारात घेऊन एमएमआरडीए प्राधिकरणाने त्यांचे सुयोग्य आर्थिक नियोजन करावे तसेच सदर प्रकल्प गुंतवणूकीकरीता योग्य असल्याचे खात्री एमएमआरडीएने करावी.

१६) सदर मेट्रो प्रकल्पाकरीता दुरुस्ती व देखभाल आगारासाठी कांजूरमार्ग येथील १५ हेक्टर जमीन व उपलब्धतेनुसार किंवा आवश्यकतेप्रमाणे इतर जागा वापरास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कायद्यानुसार जमिन वापर फेरबदल करुन हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१७) अतिरिक्त जमीन उपलब्धतेनुसार प्रकल्पासाठी निधी उभारण्याच्या दृष्टीने रहिवासी / वाणिज्यिक विकास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१८) सोबत जोडलेल्या परिशिष्ट-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मेट्रो मार्ग - ६ स्वामी समर्थनगर - जोगेश्वरी - विक्रोळी मार्गाच्या प्राधिकरणाने प्रस्तावित केलेल्या सुरुवातीच्या प्रवासी भाडेदरास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उल्लेखित केलेले भाडे मेट्रो सुरु करण्यापूर्वी वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास, त्यामध्ये आवश्यक बदल करण्याचे अधिकार वापरण्यास प्राधिकरणास प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच भाडे निश्चितीबाबतची जबाबदारी एमएमआरडीएची राहील.

१९) सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाचे कर (५०%) आणि राज्य शासनाचे कर (१००%) व जमिनीचा खर्च मिळून राज्य शासनाकडून रु. १८२०.५८ कोटी व्याजासह परतफेड करावायचे दुय्यम कर्ज देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२०) सदर प्रकल्पासाठी राज्यशासनाकडून दिले जाणारे दुय्यम कर्ज सहाय्य या कर्जाची परतफेड शासनाने निर्देशित केलेल्या अटीनुसार एमएमआरडीएकडून व्याजासह परत केली जाईल याची खबरदारी एमएमआरडीएने घ्यावी.

२१) शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सदर प्रकल्पासाठी कायमस्वरुपी आवश्यक असलेल्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२२) महसूल व वन विभागाने शासकिय जमिन २०१५/प्र.क्र.४५/ज-१, दिनांक ०१ जून, २०१५ अन्वये तसेच १ जून २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यशासनाने प्रशासकिय मान्यता दिलेल्या व निकडीचे सार्वजनिक प्रकल्पासाठी शासकीय जमिनीच्या आगाऊ ताबा देण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून त्याप्रमाणे सदर प्रकल्पासाठी शासकिय जमिन हस्तांतरणाबाबतची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आहे.

२३) सदर प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी मेट्रो रेल्वे स्थानक सुविधांकरीता व कारडेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ /नवीन केंद्रीय भूसंपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत संपादन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२४) मेट्रो मार्ग - ६ लगतच्या शासकीय व निमशासकीय संस्थांच्या मोकळया जागांचा मेट्रो रेल्वे बांधकाम कालावधी दरम्यान तात्पुरता वापर करण्यासाठी परवानगी देण्यात यावी व या दृष्टीने संबंधित विभागांनी सदर मोकळया जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सुपूर्द करण्याबाबत त्या विभागांस निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२५) मेट्रो रेल्वे स्थानक व कारडेपोच्या व्यावसायिक वापरास परवानगी देणे व त्यानुसार सदर जमिनीचा वाणिज्यिक विकास करण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२६) सदर मेट्रो प्रकल्पांतर्गत प्रकल्पबाधितांचे (PAP) पुनर्वसन व पुनर्वसाहत बहुपक्षीय/आंतरराष्ट्रीय बँक किंवा इतर आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेने सहमती दर्शविल्याप्रमणे "मुंबई नागरी परिवहन प्रकल्प पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण (MUTP- R & R Policy)" नुसार करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

२७) मेट्रो मार्ग - ६ या प्रकल्पाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२८) मेट्रो मार्ग - ६ स्वामी समर्थनगर - जोगश्वरी - विक्रोळी हा मेट्रो प्रकल्प "निकडीचा सार्वजनिक प्रकल्प" व "महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प" म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२९) शासकीय / खाजगी संस्थांना मेट्रो प्रकल्प हा इतर प्रकल्पापेक्षा महत्वाचा असेल असे निर्देश देण्यास प्राधिकरणाला प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३०) सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे "समर्पित नागरी परिवहन निधी" च्या उभारणीस आणि इतर स्रोतामधुन उपलब्ध झालेला निधी "समर्पित नागरी परिवहन निधी" मध्ये जमा करुन तो निधी सदर प्रकल्पासाठी, भविष्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी तसेच कार्य व देखभाल (O&M) इ. साठी प्राधिकरणास वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३१) मेट्रो मार्ग-२अ, मेट्रो मार्ग - २ब (डी.एन.नगर - मंडाळे), मेट्रो मार्ग- ४ (वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली) आणि मेट्रो मार्ग-६ (स्वामी समर्थनगर - जोगेश्वरी-विक्रोळी) या मार्गाकरीता कार्य आणि

देखभालीच्या (O & M) दरम्यान सुरक्षिततेसाठी तैनात करावयाचे सुरक्षारक्षक, आवश्यक साहित्य (जसे बंदूक, अश्रुधूर, श्वान पथक) इत्यादींचा पुरवठा आणि यावर येणारा खर्च हा एमएमआरडीए/प्राधिकरणाने करावा, असे निर्देश प्राधिकरणास देण्यात येत आहेत.

३२) दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित आणि मुंबई उपनगरीय रेल्वेकरीता सवलतीच्या दरात वीज उपलब्ध होत असून त्याच धर्तीवर महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळाकडून मेट्रो प्रकल्पांकरीता सवलतीच्या दरात "ना नफा ना तोटा" या तत्वावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास वीज उपलब्ध करुन देण्यासाठी विद्युत नियामक मंडळाकडे शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३३) सदर प्रकल्पासाठी विज उपलब्ध करण्यासाठी नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या धर्तीवर जास्तीत जास्त सौर ऊर्जा प्रणालीचा वापर करावा. तसेच यामध्ये महानिर्मितीचा समावेश करुन घ्यावा, अशा प्रकल्प अंमलबजावणी संस्थेस / एमएमआरडीए प्राधिकरणास सूचना देण्यात येत आहेत.

३४) प्रस्तावित मेट्रो मार्ग-६ या मार्गिकेमध्ये मजास बस डेपो / स्थानके हे बेस्टच्या मालकी हक्काचे असून, याकरीता मेट्रोचे बेस्ट सेवेशी एकात्मिकीकरण आणि बस डेपोचे वाणिज्यिक विकास करणे शक्य आहे. सदरच्या प्रस्तावास बेस्ट प्रशासनाने यापूर्वीच मान्यता दिली असून निधी उभारणे आणि विभागणी याबाबतची यंत्रणा तयार केली जाऊ शकते, याबाबत तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

३५) मेट्रो प्रकल्प-६ करीता मुंबई महानगर प्रदेशात प्रवाशांच्या सोयीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत एकात्मिक तिकिटीकरण पध्दती (ITS) सुरु प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

३६) सदर प्रकल्प द्विपक्षीय/बहुपक्षीय/आंतरराष्ट्रीय/आंतरदेशीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन त्याच्या मुद्दलाची परतफेड तसेच व्याजाची परतफेड याची जबाबदारी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांची राहील त्यामुळे शासनावर अतिरिक्त भार येणार नाही याची एमएमआरडीएने खबरदारी घ्यावी, असे एमएमआरडीएस निर्देश देण्यात येत आहेत.

३७) सदर प्रकल्पासाठी बाह्यसाहित कर्ज शासनास उपलब्ध झाल्यास ते संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांना उपलब्ध करुन देतांना या कर्जाबाबतच्या अटी व शर्ती, मुद्दलाची परतफेड, व्याजाची परतफेड बाबत दुय्यम कर्ज सहाय्य करारनामा (subsidiary Loan Agreement) करण्याची कार्यवाही करण्यात यावी तसेच सदर कर्ज व त्यावरील व्याज यांचे दायित्वाची जबाबदारी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांची राहील, असे एमएमआरडीएस निर्देश देण्यात येत आहेत.

३८) सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत, प्रकल्पामधुन मिळणारा परतावा याकरिता प्रकल्प अहवालात घेण्यात आलेल्या गृहीतकांची कसोशीने तपासणी करणे व ह्या बाबींवर स्वतंत्र अभिप्राय (Second opinion) घेण्याची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावी तथापि, स्वतंत्र अभिप्रायाची (Second opinion) वाट न पाहता निविदा प्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात येत आहे व RFQ प्रक्रिया पूर्ण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३९) सदर मेट्रो प्रकल्पाच्या बांधकाम दरम्यान होणारी वाहतुकीची गैरसोय टाळण्यासाठी वाहतूक पोलीस विभागाशी समन्वय साधुन योग्य तो नाविन्यपुर्ण वाहतूक वळण (Innovative Traffic Diversion) नियोजन/आराखडा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार करावा तसेच प्रकल्पाचे बांधकाम कालावधी दरम्यान वाहतूकीची कोंडी होणार नाही याची एमएमआरडीएने काळजी घ्यावी, असे एमएमआरडीएस निर्देश देण्यात येत आहेत.

४०) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणाऱ्या मेट्रो प्रकल्पाच्या कार्य प्रणाली चालन (O&M) साठी एक व्यवस्थापन व्यवस्था मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार करावी, असे एमएमआरडीएस निर्देश देण्यात येत आहेत.

४१) सदर मार्गिका ईपीसी आधारावर राबवित असताना भूकंप प्रवणक्षेत्र आणि संभाव्य धोका पातळीच्या तीव्रतेनुसार क्षेत्र, पर्यावरणीय आकलन आणि प्रभाव तसेच आपत्कालीन किंवा आपत्तीच्या प्रसंगी करावयाची कार्यवाही तसेच याबाबतची विशिष्ट धोरणे, मार्गदर्शक तत्त्वे, संसाधन व्यवस्थापन योजना अहवालात समाविष्ट करण्याची व या बाबी हाताळण्याबाबतची प्रणाली निश्चित करण्याची खबरदारी एमएमआरडीएने घ्यावी.

४२) सदर प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या खाजगी जमिनीच्या संपादनावरील खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वहन करावा.

४३) रोलिंग स्टॉकच्या खरेदीमध्ये उच्च स्पर्धा व्हावी यासाठी डीएमआरसीचा अनुभव विचारात घेऊन जागतिक स्तरावर निविदा मागवून अथवा केंद्र शासन/राज्यशासन यांच्या प्रचलित धोरणानुसार एमएमआरडीने कार्यवाही करावी.

४४) सदर प्रकल्पाचे प्रकल्प पूर्तीचे वेळापत्रक किंवा अशा स्वरुपाच्या यापूर्वी पूर्ण केलेल्या प्रकल्पांच्या प्रकल्प पूर्तीच्या वेळापत्रक विचारात घेऊन अपेक्षित आकस्मिक खर्च व राखीव निधीचे नियोजनाची बाब एमएमआरडीएने प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करताना विचारात घ्यावी.

४५) सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा बांधकाम खर्च तसेच मेट्रो चलनवलन आणि देखभालीचा खर्च अवाजवी वाढणार नाही याची खबरदारी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/ एमएमआरडीए यांनी घ्यावी.

४६) सदर प्रकल्पाच्या आयआरआरबाबतच्या गृहितकांची/माहितीची पुन्हा तपासणी करुन पडताळणी करावी व प्रकल्प गुंतवणूकीकरीता योग्य असल्याची खात्री एमएमआरडीएने करावी.

४७) सदर प्रकल्पाच्या प्रवाशी वाहतूक विषयक अंदाज, गृहितके व गणितीय विश्लेषण याची काळजीपूर्वक छाननी करून प्रकल्पाची आर्थिक व चलनवलनाची सुसाध्यता अबाधित राहील याची खबरदारी एमएमआरडीएने घ्यावी.

हा शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्र. ३३२२, दिनांक ०१.०४.२०१७ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.१९/अर्थबळ, दिनांक १३.०२.२०१७ अन्वये प्राप्त अभिप्राय व मंत्रिमंडळाने दिनांक २४/१०/२०१७ रोजीच्या बैठकित दिलेली मान्यता व त्यानंतर वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र.२७३/व्यय-३, दिनांक २४.११.२०१७ नुसार दिलेली सहमती यानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक **२०१७१२१६१४०१३५४२२५** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shriram Dattatray Yadav

Digitally signed by Shriram Dattatray Yadav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9da0e03bd84c1e17d78ad320814d003150fbf7d2abd36f924e5705145bf0e270, cn=Shriram Dattatray Yadav
Date: 2017.12.28 11:02:41 +05'30'

**(श्रीराम यादव)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

३. मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. सचिव, शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार, निर्माण भवन, नवी दिल्ली
६. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. प्रधान सचिव (पदुम), कृषी, पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१३. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१४. प्रधान सचिव (उद्योग) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१५. प्रधान सचिव (ऊर्जा) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१६. प्रधान सचिव गृहनिर्माण विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१७. प्रधान सचिव पर्यावरण विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१८. सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१९. सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२०. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२१. नोंदणी महानिरिक्षक व नियंत्रक मुद्रांक नियंत्रक पुणे
२२. व्यवस्थापकीय संचालक, मंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रायव्हेट लिमिटेड.
२३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे.
२५. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
२६. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
२७. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
२८. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, मुंबई
२९. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, वरळी, मुंबई.
३०. जिल्हाधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगरे/ठाणे, मुंबई.
३१. सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगरे/ ठाणे, मुंबई
३२. सह पोलिस आयुक्त वाहतूक, मुंबई/ठाणे.
३३. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मुंबई.
३४. महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
३५. महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, मुंबई.
३६. महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, (बेस्ट), मुंबई.
३७. महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई
३८. महाव्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रम, ठाणे.
३९. सह सचिव, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

४०. संचालक, नगर रचना, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे.
४१. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४२. कार्यासन अधिकारी (नवि-२१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४३. निवड नस्ती (नवि-७).

(नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१६/प्र.क्र. १४० /नवि-७, दि.२१ डिसेंबर, २०१७ चे सहपत्र)

**परिशिष्ट १**

**मुंबई मेट्रो मार्ग -६ स्वामी समर्थ नगर - जोगेश्वरी-विक्रोळी या प्रकल्पाची ठळक वैशिष्टये**

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | स्टॅन्डर्ड गेज | १४३५ मि.मी. |
| २ | मार्गाची लांबी | १४.४७ कि.मी. |
| ३ | एकूण स्थानके | १३ |
| ४ | गाडयांचे वेळापत्रक | वर्ष २०२१ - प्रति ४.२५मिनिटे<br>वर्ष २०३१ - प्रति ३.५ मिनिटे |
| ५ | प्रस्तावित कार डेपो | १५.० हेक्टर (कांजूर मार्ग) |
| ६ | इतर लागणारी जमीन | खाजगी - ३.८४ हेक्टर<br>शासकीय - ३.७८ हेक्टर |
| ७ | तात्पुरती लागणारी जमीन<br>(बांधकाम कालावधी दरम्यान) | ६.६ हेक्टर (शासकीय) |
| ८ | प्रकल्प राबविण्याचा कालावधी | एप्रिल २०१७ - मार्च २०२१ (५ वर्ष) |
| ९ | मूळ किंमत (स्थापत्य काम, पुनर्वसन व पुनर्वसाहत, प्रणाली काम, सामान्य सल्लागार, आकस्मिक खर्चासह) | रु. ३८२०.८३ कोटी |
| १० | जमिनीची किंमत | रु. ७८६.२ कोटी |
| ११ | आकस्मित खर्च जमिनीकरीता (३%) | रु. २३.५८ कोटी |
| १२ | राज्यशासनाचा कर (मूळ) | रु. ४१७.३६ कोटी |
| १३ | केंद्रशासनाचा कर (मूळ) | रु. ५१८.६४ कोटी |
| १४ | प्रकल्पाची मूळ किंमत | रु. ५५६७.०० कोटी |
| १५ | दरवाढ | रु. ११२४.०० कोटी |
| १६ | बांधकाम दरम्यानचे व्याज | रु. २५ कोटी |
| १७ | प्रकल्प पूर्णत्वाची किंमत | रु. ६७१६.०० कोटी |
| १८ | आर्थिक अंतर्गत परतावा दर (EIRR) | २१.९२ % |
| १९ | वित्तीय अंतर्गत परतावा दर मालमत्ता विकासासह (FIRR with PD) | ८.४६ % |
| २० | प्रवासी क्षमता<br>(६ डब्यांची गाडी) | ६ प्रवासी प्रतिवर्ग मीटर प्रमाणे -<br>१७५६ प्रवासी क्षमता. |
| २२ | प्रतिताशी प्रतिदिवशी प्रवासी संख्या *<br>(PHPDT) | वर्ष २०२१ - २४,७१६<br>वर्ष २०३१ - २९,६५८ |
| २३ | दैनंदिन प्रवासी संख्या | वर्ष २०२१-२२ - ६.५ लाख<br>वर्ष २०३१-३२ - ७.६९ लाख |

* *अंदाजित केलेली प्रतिताशी प्रतिदिशा प्रवासी संख्या व दैनंदिन प्रवासी संख्या ही संपूर्ण मार्गासाठी आहे.*

## परिशिष्ट २

**मुंबई मेट्रो मार्ग-६ स्वामी समर्थनगर- जोगेश्वरी-विक्रोळी या मेट्रो मार्गाच्या प्रकल्पामध्ये प्राधिकरण आणि शासनाचा आर्थिक सहभाग -**

| अ.क्र. | आर्थिक सहभागी संस्था | तपशिल (प्रकल्प पूर्णत्वाच्या किंमतीवर) | पुर्णत्वाची किंमत (रु. कोटीत) |
|---|---|---|---|
| १. | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सहभाग | अ) स्थापत्य कामासाठी लागणारा खर्च तसेच सामान्य खर्च = रु. २४१०.९० कोटी<br>ब) बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज (IDC) = २५ कोटी<br>क) एकूण केंद्रीय कराकरीता रु.६६८. ४३ कोटी रुपयांचा ५०% = रु. ३३४.२२ कोटी | **२७७०.१२** |
| २ | **राज्य शासन सहाय्य:**<br>केंद्र शासनाचे कर (५०%) आणि राज्य शासनाचे कर (१००%) तसेच जमिनीची किंमत याकरिता व्याजासह परतफेड करावयाचे दुय्यम कर्ज रुपाने राज्यशासनाकडून | अ) केंद्रीय कराकरीता रु. ६६८.४३ कोटी रुपयांचा ५०% राज्य शासनाचा सहभाग = रु. ३३४.२२ कोटी<br>ब) राज्य शासनाचा कर = रु. ५४१.३७ कोटी<br>क) जमिनीची किंमत = ९४५ कोटी | **१८२०.५९** |
| ३ | **प्रणालीची किंमत** | | |
| | अ. कर्ज सहाय्य प्रणालीची किंमत ८०% (रु. २१२४.५२ कोटी) | | १६९९.६२ |
| | ब. उर्वरित २०% प्राधिकरणामार्फत (रु. २१२४.५२ कोटी) | | ४२४.९० |
| | | **एकूण पूर्णत्वाची किंमत** | **६७१६.००** |

### आर्थिक सहभागाचा सारांश-

| अ.क्र. | आर्थिक सहभागी संस्था | रक्कम (रु. कोटीत) |
|---|---|---|
| १ | मुबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सहभाग | ३१९५.०२ |
| २ | राज्य शासनाचा सहभाग | १८२०.५८ |
| ३ | कर्ज सहाय्य | १६९९.६९ |
| | **एकूण** | **६७१६.००** |

## परिशिष्ट- ३

### मुंबई मेट्रो मार्ग-६ स्वामी समर्थनगर- जोगेश्वरी-विक्रोळी या मेट्रो मार्गाकरिता सुरुवातीचे भाडेदर तक्ता

मुंबई मेट्रो मार्ग-६ स्वामी समर्थनगर- जोगेश्वरी-विक्रोळी या मेट्रो मार्गाकरिता सुरुवातीच्या भाडे दराचे टप्पे पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.

| ***अंतर (कि.मी.)*** | *०-३* | *३-१२* | *१२-१८* | *१८-२४* | *२४-३०* | *३०-३६* | *३६-४२* | *>४२* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ***भाडे (रु.)*** | *१०* | *२०* | *३०* | *४०* | *५०* | *६०* | *७०* | *८०* |

मेट्रो मार्ग-६ स्वामी समर्थ नगर - जोगेश्वरी - विक्रोळी या मेट्रो मार्गाचे सुरुवातीचे भाडेदर वर दर्शविल्यानुसार असून त्यापुढील भाडेदराकरीता भाडे निर्धारण समिती गठीत करण्यात येईल. उल्लेखित केलेले भाडे मेट्रो सुरु करण्यापूर्वी वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास त्यामध्ये आवश्यक बदल करण्याचे अधिकार प्राधिकरणास देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहेत.

## परिशिष्ट- ४

**मुंबई मेट्रो मार्ग-६ स्वामी समर्थनगर- जोगेश्वरी-विक्रोळी मेट्रो प्रकल्प राबविण्याकरीता लागणारा निधी उभारण्याचे इतर विविध स्त्रोत:-**

मेट्रो प्रकल्प राबविण्याकरीता लागणारा निधी उभारण्याचे इतर विविध स्त्रोत हे मेट्रो मार्ग - २अ, २ब, ४ व ७ या प्रकल्पांना राज्य शासनाने मान्यता दिल्याप्रमाणे मेट्रो मार्ग - ६ स्वामी समर्थनगर - जोगेश्वरी - विक्रोळी या प्रकल्पाला देखील खालील नमूद केल्याप्रमाणे निधी उभारण्याचे इतर विविध स्त्रोत प्रस्तावित केलेले आहेत.

अ. मेट्रो मार्गिकांच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणाऱ्या जमिनीवर, अधिमूल्य आकारुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) देण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत करुन त्यानुसार अधिमूल्याची रक्कम संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व अशा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकापोटी वसूल केलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करणे.

ब. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदीनुसार आकारण्यात येणारे विकास शुल्क शासन अधिसूचित करेल, असे महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात विकास शुल्कात १००% पर्यंत वाढ करुन आकारण्याविषयी कायद्यातील तरतूदीनुसार वसूल होणारी वाढीव रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करणे.

क. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतूदीनुसार मालमत्तेचे मुद्रांक शुल्कासोबतच महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात १% अधिभार लावण्यासाठी सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, दिनांक २१.०८.२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १४९ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्या धर्तीवर शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्याचे अधिसूचित केल्यास, महानगरपालिका क्षेत्रात मुंबई मुंद्राक अधिनियम, १९५८ अन्वये स्थावर मालमत्तेचे अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण यावरील संलेखावर बसवायच्या मुद्रांक शुल्कासोबतच जमिनी व इतर स्थावर मालमत्तेचे विक्री किंवा देणगीच्याबाबतीत अशारीतीने स्थित असलेल्या मालमत्तेच्या मुल्यांवर व फलोपभोग गहाणाच्या संलेखाच्या बाबतीत संलेखात मांडण्यात आलेल्या संलेखाद्वारे सुरक्षित रक्कमेवर १% अधिभार लावण्याची तरतूद मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये करुन अशा प्रत्यक्ष जमिनी व इतर स्थावर मालमत्तेचे अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण

संलेखाच्या नोंदणीच्या वेळी सदर अधिभाराची रक्कम संबंधित जिल्हा उपनिबंधकांनी / दुय्यम निबंधकांनी वसूल करणे व शासनाने या माध्यमातून वसूल झालेल्या रक्कमेएवढे अनुदान दरवर्षी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास वर्ग करणे.

ड. मेट्रो कार डेपोच्या जागेचे वाणिज्यिक विकसनाव्दारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे.

इ. देशातील विविध मेट्रो प्रकल्प राबविण्यासाठी केंद्रशासनामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचधर्तीवर या प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडून निधी मिळविण्याकरीता राज्यशासनामार्फत पाठपुरावा करण्यात यावा. तथापी, केंद्र शासनाच्या निधी उपलब्धतेची वाट न पाहता प्राधिकरणाचा निधी वापरुन मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात यावी.

ई. मेट्रो रेल्वे स्थानकावरील जाहिरात व पार्किंगपासून मिळणारे उत्पन्न या प्रकल्पासाठी वापरणे इ.

सदर विविध स्त्रोतातून प्राप्त होणारा निधी हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर एका "समर्पित नागरी परिवहन निधीमध्ये" ठेवण्याचे संकल्पित असून त्याचा विनियोग सदर मेट्रो प्रकल्पासाठी राज्यशासनाच्यावतीने लागणाऱ्या समभागाची रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करण्याकरीता तसेच कर्जाच्या परतफेडीसाठी निधी अपूरा पडत असल्यास स्वतंत्र पूरक निधी उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे.

******